नि.क्र.१३ लगत (1) सं.फौ.ख.क्र. १०१/२०२३

शासन वि. दिमाजी

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन भाषा मराठीत पुरावा</u>**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३</u>**

मी देवा शपथ खरे सांगतो की:

माझे नावः राम अनंत जाधव

वयः २१ वर्षे, व्यवसायः मोलमजुरी

राहणार – चिंचवली, ता. रोहा, जि. रायगड.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. पवार यांच्यामार्फत :</u>**

०१. दि.१२/०३/२०२३ रोजी मला पोलीसांनी पंचनामा करण्यासाठी चिंचवली येथे आदिवासीवाडी येथे आरोपीच्या घराच्या मागे बोलावले होते. त्याप्रमाणे मी तेथे गेलो. तेथे मी, पोलीस, अनंता हजर होतो. मी तेथे बघण्यासाठी गेलो होतो परंतू पोलीसांनी मला बोलावुन घेतले. तेथे पोलीसांनी केवळ माझे नाव विचारले. पोलीसांनी पोलीस ठाण्यात पंचनाम्यावर सही घेतली. मी सही करताना पंचनाम्यातील मजकूर वाचला नव्हता. आता मला दाखवलेल्या पंचनाम्यावरील अनु.क्र.०१ ची सही माझी आहे. साक्षीदाराने सही मान्य केल्यामुळे त्यास **नि.क्र.२१** देण्यात येत आहे.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे भा.पु.कलम १५४ नुसार अभियोग पक्षातर्फे विधीज्ञांना त्यांच्या विनंतीवरुन उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येत आहे.**

नि.क्र.१३ लगत (2) सं.फौ.ख.क्र. १०१/२०२३
शासन वि. दिमाजी

०२. माझे शिक्षण इयत्ता ०९ वी झाले आहे. मला मराठी वाचता येते परंतू फार चांगले नाही. मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले त्यावेळी पोलीसांनी माझ्या समक्ष आरोपीकडुन एक सफेद मळकट रंगाचा प्लास्टीकचा फिरकीचे बुच असलेला पाच लिटर गावठी हातभट्टीची दारु असलेला कॅन जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष तसा पंचनामा केला व मी त्यातील मजकूर वाचुन त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्या ओळखीचा असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. सागर भगत यांचे मार्फत**

नाकारला.

फेरतपास नाही.

अवाचोनार स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE

Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2025.07.04 17:35:56 +0530

(एस. व्ही. खैरे)

स्थळ : रोहा.
दि.०४.०७.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.